# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 03 November 2024**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०३ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस.
- भारतीय जनता पक्षाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागं घेतील– भाजपला विश्वास.
- जिंकू शकतो अशा ठिकाणी उमेदवार देणार– मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे.

आणि

- न्यूझीलंडने भारताविरुद्धचा तिसरा कसोटी क्रिकेट सामनाही जिंकला.

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. राज्यातल्या २८८ मतदारसंघांमध्ये सात हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत.

मराठवाड्यातल्या मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत तर कोकणात उमेदवारांची संख्या मर्यादित आहे. नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्या खालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीडमध्ये ९० उमेदवारांचे अर्ज वैध आहेत. राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त ५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहीम आणि सिंधुदुर्गातल्या सावंतवाडीत प्रत्येकी सहा, तर शिवडी आणि कुडाळमध्ये सात उमेदवारांचे अर्ज ग्राह्य धरण्यात आले आहेत.

****

राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी आपापल्या पक्षातल्या बंडखोरांना शांत करण्याच्या प्रयत्नात असल्याचं दिसून येत आहे. उद्या सोमवारी अर्ज मागे घेण्यात आल्यानंतर राज्यातल्या प्रमुख पक्षांच्या जागावाटपाचं चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान,  भारतीय जनता पक्षाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागं घेणार नाहीत, त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिला आहे.

****

पुणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी महायुतीत बंडखोरी झाल्याचं चित्र आहे. भारतीय जनता पक्ष तसंच शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार असताना मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने 'एबी फॉर्म' देत उमेदवार दिले आहेत. त्यामुळं महायुतीत वादंग निर्माण झाला आहे. दरम्यान, ही बंडखोरी टाळण्यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी बंडखोरीचा फटका रोखण्यासाठी नुकताच पुण्याचा दौरा केला.

****

रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जागावाटपामधील नाराजी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा असं आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे आहे. रिपब्लिकन पक्ष महायुतीचा घटक पक्ष असल्याने महायुतीला विजयी करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असं सोनवणे यांनी म्हटलं आहे.

****

धनगर समाजाच्या न्याय्य हक्कासाठी लढणारी संघटना अशी ओळख असलेल्या यशवंत सेनेनं विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला आपला पाठींबा देत असल्याचं जाहीर केलं आहे. संघटनेचे अध्यक्ष आणि सरसेनापती माधव गडदे यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर ही भूमिका जाहीर केली.

****

आपण ज्या जागा जिंकू शकतो अशा ठिकाणी उमेदवार देऊ आणि इतर ठिकाणी ज्यांनी आपल्याला त्रास दिला त्यांचा आपण पराभव करू अशी भूमिका मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज जाहीर केली. विधानसभा

निवडणुकांबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी जालन्यातील अंतरवाली सराटी इथं जरांगे यांनी सहकाऱ्यांसोबत घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. मराठवाड्यातल्या जालना, भोकरदन, बीड, केज, फुलंब्री, कन्नड आणि हिंगोली या विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार देण्याबाबत या बैठकीत प्राथमिक चर्चा करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर समान नागरी कायदा लागू करू, मात्र आदिवासींना त्याच्या कक्षेतून बाहेर ठेवू असं आश्वासन भारतीय जनता पक्षानं दिलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचं पक्षाचं संकल्प पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज रांचीमध्ये प्रसिद्ध केलं. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिलं. संथाल परगणा भागातली बांग्लादेशी घुसखोरी रोखण्यासाठी कायदे बनवले जातील असं त्यांनी सांगितलं. 'गोगो दीदी' योजनेअंतर्गत पात्र महिलांना एकवीसशे रुपये, पात्र कुटुबांना ५०० रुपयांत गॅस सिलिंडर, दसरा आणि रक्षाबंधनला गॅस सिलिंडर मोफत देण्याचं आश्वासनसुद्धा त्यांनी दिलं. पदवीधर आणि पदव्युत्तर बेरोजगारांना दोन वर्षांसाठी दोन हजार रुपये मानधन देऊ. पाच वर्षांत रोजगाराच्या पाच लाख संधी निर्माण करु, असंही शाह म्हणाले.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज बुलडाणा जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

हिंगोली जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी जनजागृती पथकाची नेमणूक केली आहे. हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या सुचनेनूसार या पथकामार्फत मतदार जागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत. या पथकातील सदस्य आणि आयकॉन डॉ. विजय निलावार यांनी दिव्यांग मतदारांनी सक्षम ॲपचा वापर करावा आणि मतदान करावं, असं आवाहन केलं आहे.

**बाईट – डॉ. विजय निलावार**

****

भारतानं न्यूझीलंडविरुद्धच्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामनाही गमावला आहे. मुंबईत वानखेडे मैदानावर आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडनं भारतावर २५ धावांनी मात केली. नऊ बाद १७१ धावसंख्येवरुन पुढं खेळताना न्यूझीलंडचा डाव सकाळच्या सत्रात १७४ धावांवर आटोपला होता. पहिल्या डावात पाच गडी बाद करणाऱ्या रविंद्र जडेजानं या डावातही ५ गडी बाद केले. पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळं भारतासमोर विजयासाठी १४७ धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी पुन्हा गडगडली, आणि संघाचा दुसरा डाव केवळ १२१ धावांवर आटोपला. यष्टीरक्षक ऋषभ पंतनं ६४ धावा काढताना एकाकी झुंज दिली. न्यूझीलंडच्या एजाज पटेलनं दुसऱ्या डावात ६ गडी बाद करत सामन्यात एकूण ११ बळी टिपले. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. विल यंग मालिकावीर ठरला. न्यूझीलंडनं या मालिकेतल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात आठ गडी राखून विजयी मिळवल्यानंतर दुसरी कसोटीही ११३ धावांनी जिंकली होती.

****

शिंदे गटाचे नेते, मंत्री अब्दुल सत्तार यांच्या चौकशीचा आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. सत्तार यांच्या निवडणूक शपथ पत्रातील मालमत्तेसंबंधी माहितीमध्ये १६ त्रुटी असल्याचे आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली आणि डॉ. अभिषेक हरिदास यांनी निवडणूक आयोगाकडे एका तक्रारीद्वारे केले होते. निवडणूक आयोगानं या तक्रारीची दखल घेत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना या प्रकरणाची तातडीनं चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे येत्या सहा तारखेला दिलीप धोत्रे यांच्या प्रचारासाठी पंढरपूरमधील मंगळवेढ्याचा दौरा करणार असल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यात भरधाव जीपनं दिलेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला. काल रात्री उशीरा नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर लोय पिंपळोद गावाजवळ हा अपघात झाला. रस्त्याच्या कडेला नादुरुस्त दुचाकीजवळ उभ्या असलेल्यांना भरधाव गाडीनं धडक दिली. यात १२ ते ४० वर्षं वयोगटातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. या

अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याला नंदुरबार इथं जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती, आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर तसंच पैठण इथं आज दिवाळी निमित्त सगर महोत्सव साजरा करण्यात आला. या महोत्सवाला शंभर वर्षां पेक्षाही अधिक काळाची परंपरा असल्याचं सांगितलं जातं. या महोत्सवा अंतर्गत रेड्यांची वाजत- गाजत मिरवणूक काढण्यात आली. पशूपालक या मिरवणूकीत पारंपारिक पोषाख घालून उत्साहानं सहभागी झाले. ढोल वाजवत, फटाके उडवत ग्रामदैवत असलेल्या संस्थान गणपती मंदीरा पर्यंत सजवलेल्या रेड्यांची विविध भागांतून मिरवणूक काढण्यात आली.

****

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी २४ वर्षीय फातिमा खानला अटक केली आहे. फातिमा खान हिला ठाणे जिल्ह्यातल्या उल्हासनगरमधून आज अटक करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

****

गडचिरोली जिल्ह्यातल्या आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांचं काल रात्री नागपूर इथं एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थीव देहावर आज दुपारी आरमोरी तालुक्यातल्या जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

****